नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २७९ । किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# पारनेरच्या पाणीप्रश्नावर मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक; वर्षभरात योजना पूर्ण करण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट**

पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर शहराच्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाणीप्रश्नाला कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पारनेर नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन पाणीपुरवठा योजनेबाबत सविस्तर चर्चा केली.

पारनेर शहराची वाढती लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची वाढती गरज तसेच सध्याच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी याबाबत औटी यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे लक्ष वेधले. पारनेर शहरासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन कालबद्ध पद्धतीने या योजनेचे काम मार्गी लावावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेर शहराच्या पाणीप्रश्नाकडे शासन सकारात्मकपणे पाहत असून येत्या सहा महिन्यांत या योजनेच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

त्यानंतर साधारण एका वर्षाच्या कालावधीत योजना पूर्ण करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

पारनेर शहराचा पाणीप्रश्न हा दरवर्षी उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या टंचाईपुरता मर्यादित नसून भविष्यातील शहराची गरज लक्षात घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्यामुळे नव्या पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पारनेरकरांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा पाठपुरावा करण्यात आला असल्याचे माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांनी सांगितले.

पारनेर शहराच्या पाणीप्रश्नासाठी झालेल्या या पाठपुराव्यामुळे आगामी काळात शहरासाठी शाश्वत पाणीपुरवठा योजनेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



> **पारनेरकरांचा पाणीप्रश्न हा आमच्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा विषय आहे. नागरिकांना दरवर्षी पाणीटंचाईला सामोरे जावे लागू नये, यासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे या प्रश्नाला आता गती मिळत आहे. निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष काम कालबद्ध पद्धतीने पूर्ण करून पारनेरकरांना दिलासा मिळावा, यासाठी पुढील काळातही सातत्याने पाठपुरावा केला जाईल,**
> **विजय औटी (माजी नगराध्यक्ष, पारनेर)**

# गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे आणि लेझर ला बंदी

## आदेशाचा भंग केल्यास कडक कारवाई

**आपल्या भारतीय संस्कृतीतील पारंपारिक वाद्याचा वापर करावा-जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिला**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील गणेश मंडळांनी गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनी प्रदूषणासह नियमांचे पालन करावे. प्लाझ्मा-लेझरचा वापर करू नये तसेच मोठ्या आवाजातील डीजे न वाजवता पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचा भंग करून ध्वनी प्रदूषण केल्यास नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा

इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिला.

अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात सार्वजनिक गणेश मंडळांकडून गणरायाचे स्वागत करताना अनेक मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत तसेच कमी आवाजातील साऊंड सिस्टीमचा वापर करीत पोलिसांना सहकार्य केले. आता गणेश विसर्जन मिरवणुकीची तयारी सुरू झाली असून, गणेश विसर्जन मिरवणुका मोठ्या प्रमाणावर निघणार आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीत मोठ्या आवाजातील डीजे, प्लाझ्मा-लेझर आणि ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा यावर्षी जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या स्तरावर सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी, मंडळांचे प्रमुख तसेच डीजे चालक व मालक यांच्या बैठका घेण्यात आल्या आहेत त्यांचे मत परिवर्तन करण्याची खूप प्रयत्न केले . या बैठकांमध्ये मिरवणुकीदरम्यान डीजेचा वापर करू नये, प्लाझ्मा लेझर बंद ठेवावेत तसेच ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या उपकरणांचा वापर टाळावा, संबंधित पोलीस स्टेशन यांनी नोटीसा संबंधितांना देण्यात आल्या आहेत. गणेशोत्सव हा धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव असल्याने मंडळांनी पारंपरिक वाद्यांचा वापर करून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवावे,

असे आवाहन अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळांनी ढोल-ताशे, लेझीम आपल्या भारतीय पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून उत्सव साजरा करताना ध्वनी मर्यादांचेही पालन करावे, अशी

अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मोठ्या आवाजातील डीजेमुळे लहान मुले वृद्ध व्यक्ती तसेच नागरिक यांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी या ध्वनी प्रदूषणाचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

गणेश मंडळांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून प्रशासन

आणि पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.विसर्जन मिरवणुकीत उत्साहाच्या भरात नियमांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी अहिल्यानगर जिल्हा पोलिसांकडून आवश्यक ती दक्षता घेतली.



मा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या ध्वनी प्रदूषणासंदर्भातील नियमांचे पालन करणे प्रत्येक मंडळाची. संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजविणे किंवा प्लाझ्मा-लेझरचा वापर करणे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अधीक्षक सुदर्शन यांनी दिला आहे. सर्व गणेश मंडळांना विनंती केलेली आहे की त्यांनी डिजेचा वापर करू नये. आतापर्यंत बरेच ठिकाणी कारवाई सुरू पण झालेली आहे. सर्वांना क्लिअर मेसेज दिलेला आहे की आवाजाची दिलेली मर्यादा पाळा नाहीतर कारवाईला सामोरे जा. असा इशारा अहिल्यानगर अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिला आहे.






# सप्तरंगी, सप्तगुणी व्यक्तिमत्वाचा गौरव..!

## थोर समाजसेवक, दानशूर व शिक्षणमहर्षी

# शेठ डॉ. नानजीभाई ठक्कर



# एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व!

**ईश्वर शक्तीचा मानवी अवतार म्हणजे सप्तरंगी, सप्तगुणी जय भगवान शेठ डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला. मानवी मनाच्य दुःखावर ईश्वरी शक्ती प्राप्त झाललेच पांघरुण घालू शकतात. त्यांच्या सुख दुखः ना ओळखू शकतात. ते प्रत्येक सजीवात ईश्वर पाहतात त्याची पुजा करतात. तन मन धनाच्याही पलिकडे जाऊन स्वतः ला मानवी मुल्यांच्या जपणुकीसाठी वाहून घेतात. ते दूसरे तिसरे कुणी नसुन आपले अपल्या सर्वांचे आवडते शेठ डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला.**

■ सप्तरंगी नानजीभाई इंद्रधनुष्याच्या रंगासारखे आहेत. त्यांच्यातील सप्तगुणांची ओळख शब्दामध्ये करुन देणे अवघड नाही तर अशक्यप्राय गोष्ट आहे. इंद्रधनुष्य फक्त पावसाळयात दिसते परंतु नानजीभाईम धील इंद्रधनुष्य क्षणा क्षणाला दिसते, त्यांच्यातील विविध कौशल्याच्या गुणांची ओळख करुन देते म्हणूनच अनेक संत त्यांना 'ईश्वर अवतार', 'देवात्मा' म्हणतात लोक ओळखतात.

■ ज्या नानजीभाईना ईश्वर शक्ती प्राप्त झालेली आहे त्या नानजीभाईनी कितीही दान दिले तरी त्यांना काही कमी पडणार नाही. कोणत्याही क्षेत्रात त्यांच्या कार्याला यश मिळाल्याशिवाय राहत नाही. राहाणार नाही. म्हणूनच की काय त्यांना लोक 'दानशूर' म्हणून ओळखतात. संत त्यांना 'धर्मात्मा' म्हणून ओळखतात कारण ते रघुवंशी आहेत आणि रघुरियासारखे ते धर्माचे रक्षण करण्यासाठी तन मन धनानी उभे आहेत. दान, धर्म करताना मानवरुपी मनाला योग्य वळण लावण अत्यावश्यक आहे म्हणून त्यांनी कित्येक शिक्षणसंस्था काढल्या ते लाखो -मुलांना शिक्षणाचे दोन देता हेत म्हणून त्यांना लोक 'शिक्षण महर्षी' या पदाने संबोधतात. या लाखो मुलांचे भवितव्यासाठी लागणारा पैसा उभा करणे साधी गोष्ट नाही परंतु त्यानी इमानदारी आणि मेहनतीच्या ताकदीवर अनेक उद्योगधंदे उभारले त्यातून पैसा मिळवला आणि समाजातील अनेक लोकांच्या कल्याणासाठी उधळला. त्यांच्या उद्योगधंद्यातील यशाला साजेल असा, 'उद्योगरत्न' हाही किताब डॉक्टरांनी हस्तगत केला आहे. निस्वार्थी भावना, लोकांचे कल्याण सामाजाचे हित, याशिवाय ज्या माणसाला काहीच दिसत नाही. त्या माणसाला लोकांनी जर 'समाजरत्न' म्हणनू संबोधले नाही तरच नवल! अशा या अष्टपैलू ईश्वरी शक्तीचे मानवी अवतार धारण करणाऱ्या डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्याबद्दल लिहिण्यासाठी शब्द आपुरे पडताहेत.

■मी एकदा नानजीभाईनां म्हणालो, सर आपल्याला किती लोक ओळखतात? या प्रश्नाचं उत्तर केवळ त्यांनी सिम्त हास्य करुन दिलं. परन्तु मला उत्तर मिळालं होतं. त्यांच्या कार्यालयात नव्हे तर त्यांच्या मंदिरात येणाऱ्या हजारो, लाखो भक्तांचे ते चाहते आहेत. त्याप्रसंगी उपस्थित असलेल्या एक साध्वी म्हणाल्या 'जो भगवंताला ओळखतो अणि भगवंत ज्याला ओलखतात त्या माणसाला किती लोक ओळखतात हे सांगणे अशक्य आहे.' खरोखरच त्यांच्याकडे येणार माणसां, त्याच्या दर्शनासाठी त्यांचा कार्यक्रमात अक्षरशः त्यांच्या पायावर लोटांगण घालणारी माणसं यांची गणती करणे कठीण आहे. म्हणूनच की काय त्यांनी केवळ एका स्मित हास्यांनी मला या प्रश्नाचं उत्तर दिलं.

■ अशा ईश्वरी अवताराच्या, दानशुरचा, धर्मात्म्याचा, समाजरत्नाचा, उद्योगरत्नाचा, शिक्षण महर्षीचा जन्म २३ सेप्टेंबर १९४४ रोजी गुजरातमधील कच्छ जिल्ह्यातील नंदासर या खेडयात झाला. परन्तु त्यांच्या आई वडिलांच्या पुण्याईनी ते मात्र खेडयात राहिले नाहीत. चौथी पर्यंत शिक्षण घेऊन परिस्थितीचा बाऊ न करता परिस्थितीवर मात करुन त्यांनी जन्मभूमी सोडली. खर सांगू आम्ही महाराष्ट्रीन त्या कच्छभूमिचे शतशः ऋणी आहोत जिने ह्या थोर माणसाला महाराष्ट्रात पाठवलं. हा थोर डॉ. नानजीभाईनी जन्म भूमी कच्छ बरोबर, कर्मभुमी महाराष्ट्राच नाव संपूर्ण जगात पसरवून जन्म आणि कर्म भूमीला धन्य केलं, ज्या माणसाला ईश्वरी शक्ती प्राप्त झालेली असेल त्या माणसाच्या प्रगतीला माणूस राखूच शकत नाही. त्यानी स्वतः नोकरी करुन वेळप्रसंगी फुटपाथावर झोपून, कष्टाने, चिकाटीने इमानदारीने स्वतः चे दुकान थाटले, ईश्वराच वरदहस्तच डॉ. नानजीभाई वर होता म्हणून नानजीभाई बनवण्यास वेळ लागला नाही. अनेक दुकाने, अनेक शाळा, अनेक धर्मशाळा, अनेक समाजिक संस्था, एकातून अनेकात रुपांतर करुन नानजीभाई देशातील नव्हे तर परदेशातील सरकारला, श्रीलंकेतील सरकारला पी. एच.डी. देण्यास भाग पाडून डॉक्टरेट किताब मिळवला. चौथीपर्यंत शिकलेली व्यक्ती डॉक्टरेट किताब मिळवू शकते यातच त्यांच्या सर्व कार्याचा आढावा येतो.

■ भारतभूवर श्रीमंत माणसाची कमरता नाही. पैसा आला की लोक पारमेश्वर आणि परमेश्वररुपी मानवाला विसरतात. त्यांचा केंद्रबिंदु असतो तो फक्त पैसा. पैशापुढे सर्वकाही अर्थशून्य असतं. आज समाजात कित्येत उदाहरण आहेत जेवढा माणूस मोठा तेवढाच तो खोटा, परंतु हे समीकरण डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या बाबतीत सपशेल खोट ठरलं ते पैशाने धनवान झाले करोडपती झाले, अब्जोपती झाले पैशाबरोबरच ते मनानेही मोठे झाले, ईश्वरचरणी त्यांच्या कार्याला रुजु करुन ते करोडपती, अब्जोपती झाले आणि समाजाच्या दीन दुबळ्यांना गरजूंना, पिडतांबरोबर, धर्मकार्याला, शिक्षणकार्याला, समाजकार्यालया मदत करण्यासाठी तन मन धनाचा खजिना त्यानी खुला केला, पण हा खुला केलेला खजिना कधी रिकामा झाला नाही. आणि होणारही नाही याची खात्री त्यांच्याबरोबर त्यांच्या दोन्ही मुलांना (जित, परंश) आणि डॉक्टरांच्या धर्मपत्नी सौ. धनलक्ष्मी बेन यांनाही झाली. डॉक्टरांच्या धर्मपत्नी नाव धनलक्ष्मी बेन त्यांच्या नावातील पहिले शब्द ध आणि

■ नानजीभाई यांच्या नावातील पहिले शब्द न म्हणजेच (ध + न = धन) धन. हा योगायाग त्याच्या जीवनात खरा ठरला धनलक्ष्मीबेनच्या रुपात धन आलं अणि म्हणूनच की काय ते 'स्त्रीला लक्ष्मीचं रुप मानतात. घरातील स्त्रीला हासत ठेवलात तर घर हसत राहील. हसऱ्या घरात लक्ष्मी धावून येईल जर घरातील स्त्री दुःखी असेल तर त्या घरात लक्ष्मी आणि सुख दोन्ही कधीच येणार नाहीत'. त्यांच्या धर्मपत्नी म्हणतात, 'नानजीभाई मला जास्त वेळ देऊ शकत नाहीत परंतु त्यांच्या समाजकार्याकडे बघितल्यानंतर जे समाधान मिळते ते सर्व तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यास पुरेस असते मन मन मोठ्या अभिमानाने असला पती मिळाल्याबद्दल स्वतः ला भाग्यवान समजतं असे हे कुटुंबवत्सल डॉ नानजीभाई ठक्कर हे एन. के. टी. चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. तसे ते ४०० हून अधिक संस्थांचे दाता व ट्रस्टी आहेत. या ट्रस्टच्या माध्यमातून भारततातीय छोट्यातल्या छोट्या गावात व मोठ्या शहरात समाजकार्य करीत असतात, गोर गरिबांचे अधार बनतात.

■ धर्माचे रक्षक बनतात. एवढेच नव्हे तर ते परदेशातही समाजकार्य करीत असतात. त्यांची एक संस्था अमेरिकेतील न्यु जर्सी येथे आहे. नुकतेच त्यांच्या हस्ते कोलकत्या जवळ ६०० एकर जमीन ८०० कोटीहून अधिक किमतीचे कृष्णाचे मंदिराच्या पायाभरणीचे उदघाटन झाले. ५४ देशांच्या प्रतिनिधी समोर ह्या चौथी शिकलेल्या नानजीभाई भाषण प्रभावी ठरलं. समाजला प्रबोधन देणार ठरलं. या ५४ देशाच्या लोकांना पटलं आणि डॉ. नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते वेदान्त कॉलेजचे उदघाटन करण्यासाठी पाश्चिमात्य देशाचं नियंत्रण आलं. कलकत्याजवळील हे मंदिर ईस्कॉन असून डॉ. नानजीभाई ईस्कॉनचे सदस्य असून ते ईस्कॉनच्या अनेक कार्याना सर्व प्रकारची मदत करतात. ईस्कॉनच्या माध्यमातून गीतेचा प्रचार आणि प्रसार करण्यास मदत करतात. नुकतेच एका कोटनि गीतेला राष्ट्रग्रंथ म्हणून देशाने स्विकारावे अशी सुचना केली आहे. ते कार्य डॉ. नानजीभाई ठक्कर ईस्कॉनच्या माध्यामातून अनेक वर्षापासून करीत आहेत. आध्यात्मिकतेला डॉ. नानजीभाई यांनी आपल्या जीवनात प्रथम स्थान दिले आहे. आज वयाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण करताना त्यांची स्फुर्ती, शक्ती आणि गरीबांसाठी २४ तास आणि ३६५ दिवस काम करताना ते कधीच थकलेले दिसत नाहीत. आजच्या तरुणाला लाजवतील अशा पद्धतीची त्यांची स्फुर्ती आहे. ते नेहमी त्यांचं वय ४० च सांगतात कारण अजुरही त्यांच्यात ४० ची उमेद आहे. आजही ते त्याचं जोमाने कार्य करीत असतात. परन्तु त्यांच्या वयाच्या ४० तील काम भवितव्यासाठी होंत परंतु अताच काम मात्र ते लोकाच्या, समाजाच्या, धर्माच्या, शिक्षणाच्या सर्व बाबीच्या भवितव्यासाठी आहे.

■ त्यांना त्यांच्या या शक्तीचे रहस्य विचारले असता ते म्हणतात, 'जय भगवान... जय भगवान... जय भगवान... या मंत्राचा जप करा, मी अनुभव घेत आहे. मी नेहमी जस भगवान चा मंत्र म्हणत असतो. झोपेतही माझे जय भगवान चालू असते. म्हणून माणसासारखा राहिला पाहिजे, सर्वात देव पाहिला पाहिजे, देवाच्या दरबारात आपण करीत असलल्या सर्व घटनांचा नोद होत असतो कारण आपण जरी रात्री झोपलो तरी देव झोपत नाही. देवाचा व्हिडीओ २४ तास चालु असतो. त्यामुळे देवाला आवडणार नाही, माणसाला घातक असेल असे कोणतेही कृत्य करु नका. आणि घरातील स्त्रीला लक्ष्मी समजेले पाहिजे, जर मंदिरात आपण नशापाणी करु शकत नाही, सिगरेट ओढू शकत नाही तर हह्या गोष्टी घरात कश्या चालतील? या सर्व गोष्टींना मी आत्मसात केलं. घराला मंदिरासाखे बनवले, सर्व व्यसनांना घरातून हाकलून दिले. घरातील स्त्रीला लक्ष्मीच रुप मानलं, माझ्या सर्व मुलांना व मुलींन शिक्षण दिलं, आई वडिलांना दैवत मानलं. घरात लक्ष्मी धवात आली. ती एक नंबरची आणि माझं जीवन सुखी बनलं आजही मी चाळीशीतल्या तरुणासारखं काम करु शकतो. याच कारण मी पाळलेली सामाजिक बांधिलकी, समाजातील चांगली तत्त्वे'. म्हणून डॉ नानजीभाई आपल्या प्रवचनातून सांगतात, 'जो संत किर्तन करते हैं लोंगो को धर्म के प्रति, समाज की प्रति निती नियमो का पालन करने के लिये कहते है.



: लेखन :
डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरुन















# शेअर बाजार म्हणजे जुगार नाही; योग्य ज्ञानाने तो संपत्ती निर्माण करण्याचा मार्ग : लेखक निलेश लोढा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शेअर बाजार म्हटले की अनेकांच्या मनात सर्वप्रथम जोखीम, चढ-उतार आणि नुकसान हेच विचार येतात. काही जण तर शेअर बाजाराला थेट जुगाराची उपमा देतात. मात्र, वास्तव यापेक्षा वेगळे आहे. ज्ञान, योग्य नियोजन, संयम आणि शिस्त यांच्या आधारावर शेअर बाजार दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकतो.

आज सामान्य माणूस आपल्या उत्पन्नातील काही हिस्सा बचत करतो. पैसा बँकेत ठेवणे, सोने खरेदी करणे किंवा स्थावर मालमत्तेत गुंतवणूक करणे हे पारंपरिक पर्याय अनेक वर्षांपासून प्रचलित आहेत. त्याचबरोबर, शेअर बाजारही आता गुंतवणुकीचा एक महत्त्वाचा पर्याय बनला आहे.

शेअर बाजार म्हणजे काय?

सोप्या भाषेत सांगायचे झाले, तर एखाद्या कंपनीला व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी भांडवलाची गरज असते. त्यासाठी कंपनी आपल्या मालकीचा काही हिस्सा-म्हणजेच शेअर्स-गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध करून देते. आपण त्या कंपनीचे शेअर्स खरेदी केले, तर त्या कंपनीमध्ये आपला छोटासा मालकीहक्क निर्माण होतो.

कंपनीची कामगिरी चांगली राहिली, व्यवसायाचा विस्तार झाला आणि भविष्यातील अपेक्षा सकारात्मक राहिल्या, तर तिच्या शेअरच्या किमतीत वाढ होऊ शकते. मात्र परिस्थिती प्रतिकूल असल्यास शेअरची किंमत कमीही होऊ शकते.

म्हणूनच शेअर बाजारातून परतावा मिळण्याची शक्यता असते; मात्र त्यासोबत जोखीमही असते.

गुंतवणूकदारांची सर्वात मोठी चूक कोणती?

बाजारात नव्याने प्रवेश करणाऱ्या अनेक गुंतवणूकदारांची सर्वसाधारण चूक म्हणजे दुसऱ्याच्या सांगण्यावरून शेअर्स खरेदी करणे.

हा शेअर नक्की वाढणार आहे, उद्या मोठा नफा मिळेल किंवा ही टिप चुकवू नका अशा संदेशांवर विश्वास ठेवून अनेक जण कोणताही अभ्यास न करता पैसे गुंतवतात.

शेअर खरेदी करण्यापूर्वी कंपनीचा व्यवसाय काय आहे, तिचे उत्पन्न आणि नफा कसा आहे, तिच्यावर किती कर्ज आहे, भविष्यातील व्यवसायवाढीची क्षमता किती आहे आणि शेअरचे मूल्यांकन योग्य आहे का, याचा विचार करणे आवश्यक आहे.

'गुंतवणूक आणि ट्रेडिंग एकच नाही'

शेअर बाजारात प्रवेश करताना आणखी एक महत्त्वाचा फरक समजून घेणे गरजेचे आहे-गुंतवणूक आणि ट्रेडिंग.

गुंतवणूक साधारणपणे दीर्घकालीन दृष्टिकोनातून केली जाते. चांगल्या व्यवसायातील मालकीहक्क घेऊन त्या व्यवसायाच्या वाढीत सहभागी होणे, हा गुंतवणुकीमागचा मुख्य विचार असतो.

ट्रेडिंगमध्ये मात्र अल्पकालीन किमतीतील चढ-उतारांचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे त्यात निर्णय घेण्याचा वेग, बाजाराचे निरीक्षण आणि जोखीम यांचे महत्त्व अधिक असते.

विशेषतः ऋज आणि जर्ळिपी ढीरवळपस मध्ये जोखीम मोठी असू शकते. त्यामुळे नव्या गुंतवणूकदारांनी प्रथम बाजाराची मूलभूत माहिती समजून घ्यावी आणि त्यानंतर स्वतःची जोखीम सहन करण्याची क्षमता ओळखावी.

बाजार पडला तर काय करावे?

शेअर बाजार कायम वरच जाणार नाही आणि कायम खालीही राहणार नाही. बाजारात तेजी-मंदीचे चक्र सुरूच असते.

त्यामुळे बाजारातील प्रत्येक घसरण म्हणजे संकट आणि प्रत्येक तेजी म्हणजे संधी, असे सरळ समीकरण लावता येत नाही.

गुंतवणुकीचा निर्णय घेताना भावनेपेक्षा माहिती, विश्लेषण आणि नियोजनाला अधिक महत्त्व द्यावे.

बाजारातील चढ-उतारांकडे दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहणे, गुंतवणुकीत विविधता ठेवणे आणि संपूर्ण पैसा एका शेअरमध्ये न गुंतवणे, ही मूलभूत शिस्त अत्यंत उपयुक्त ठरते.

'शेवटी एक महत्त्वाचा विचार'

शेअर बाजारातून पैसा कमावण्यापेक्षा तो टिकवणे आणि शिस्तीने वाढवणे अधिक महत्त्वाचे आहे.

बाजारात गुंतवणूक करण्यापूर्वी स्वतःला तीन प्रश्न विचारावेत-

१. मी कोणत्या उद्देशाने गुंतवणूक करत आहे?

२. माझी जोखीम सहन करण्याची



क्षमता किती आहे?

३. ज्या कंपनीत मी गुंतवणूक करत आहे, तिचा व्यवसाय मला समजतो का?

या तीन प्रश्नांची उत्तरे स्पष्ट असतील, तर शेअर बाजाराकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन नक्कीच अधिक समतोल आणि वास्तववादी होऊ शकतो.

शेअर बाजार हा जुगार नाही; मात्र अज्ञान, लोभ आणि घाईने त्यात प्रवेश केला, तर तो जुगारासारखा नक्कीच भासू शकतो.

म्हणून बाजारात उतरण्यापूर्वी एकच मंत्र लक्षात ठेवा-

पहिले ज्ञान, मग गुंतवणूक; आधी शिस्त, मग नफा.

# २५ सप्टेंबरपर्यंत राज्यातील विविध जिल्ह्यांना यलो अलर्ट

## मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाची शक्यता

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबई वेधशाळेने पुढील चार दिवसांसाठी हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. संबंधित जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.




२२ सप्टेंबर : नाशिक, नाशिक घाट, अहिल्यानगर, ठाणे, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा, सातारा घाट, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली.

२३ सप्टेंबर : नाशिक, नाशिक घाट, अहिल्यानगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा, सातारा घाट, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना, परभणी, वाशिम, बुलढाणा, अकोला, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली.

२४ सप्टेंबर : सातारा, सातारा घाट, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, लातूर, नांदेड, जालना, परभणी, वाशिम, बुलढाणा, अकोला, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली.

२५ सप्टेंबर : वाशिम, बुलढाणा, अकोला, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली. यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होत असताना आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# पाणी योजनेच्या मंजुरीसाठी उपोषणाऐवजी पाठपुरावा हवा

## महायुतीच्या नगरसेवकांची भूमिका; पदाधिकारी व लोकप्रतिनिधींवर विश्वास

पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर शहराच्या पाणी योजनेचा प्रस्ताव सध्या मंत्रालयात प्रलंबित असून, योजनेला मंजुरी मिळावी यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून आमदार काशिनाथ दाते गेल्या दीड वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. योजना अंतिम मंजुरीच्या टप्प्यात असताना सत्ताधारी महायुतीतील कार्यकर्त्यांनी उपोषण करण्याऐवजी शासनस्तरावर पाठपुरावा करणे योग्य असल्याची भूमिका नगरसेवक युवराज पठारे, अशोक चेडे, नवनाथ सोबले, कांतिलाल ठाणगे व निता ठुबे यांनी पत्रकार परिषदेत मांडली.

नगरसेवकांनी सांगितले की, माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी पाणी योजनेसाठी उपोषणाची भूमिका घेतली आहे. मात्र, त्यांच्या कार्यकाळातच योजनेसाठी प्राथमिक हालचाली सुरू झाल्या होत्या. योजनेला तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतर आवश्यक असलेले ७३ लाख रुपये शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे आता पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे व आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा करून योजना मार्गी लावणे अधिक योग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेवक अशोक चेडे यांनी सांगितले की, आमदार काशिनाथ दाते यांनी आमदारपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून पारनेरच्या पाणी योजनेसाठी पाठपुरावा सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार तसेच नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांकडे त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. नगरविकास विभागाचे सहसचिव सहस्त्रबुद्धे यांच्याशीही अलीकडे संपर्क साधण्यात आला असून, केंद्र सरकारच्या नगरोत्थान योजनेतून ही योजना घेण्यात आली असल्याने सुयोग्य योजनेतून मंजुरी देण्यात येईल,




> आमदार काशिनाथ दाते यांनी पदभार स्वीकारल्यापासून पारनेरच्या पाणी योजनेसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. योजना अंतिम मंजुरीच्या टप्प्यात असल्याने उपोषणाऐवजी शासनस्तरावर पाठपुरावा करून ती मार्गी लावणे योग्य आहे. लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नांवर नागरिकांनी विश्वास ठेवावा.
>
> **-अशोक चेडे (नगरसेवक, पारनेर)**

> पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे आणि आमदार काशिनाथ दाते हे पारनेरच्या पाणी योजनेसाठी आग्रही आहेत. ते सातत्याने योजनेचा आढावा घेत आहेत. त्यामुळे महायुतीच्या पदाधिकारी व लोकप्रतिनिधींच्या माध्यमातूनच योजना मंजूर होईल, असा आम्हाला विश्वास आहे.
>
> **- युवराज पठारे (नगरसेवक, पारनेर)**

अशी माहिती मिळाल्याचे चेडे यांनी सांगितले.

जिल्हा बँकेचे संचालक प्रशांतदादा गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष राजू औटी, उपाध्यक्ष सुनील गाडगे, महिला शहराध्यक्षा कविता औटी यांच्यासह सर्वसामान्य कार्यकर्ते या भूमिकेसोबत असल्याचे नगरसेवकांनी सांगितले. नवनाथ सोबले,

# कर्मवीरांच्या विचारांचा जागर; काष्टीत १३९ वी जयंती उत्साहात साजरी

## डॉ. संजय कळमकर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन; विद्यार्थ्यांच्या लेझीम, झांज व टिपरी पथकांनी वेधले लक्ष

**हजारो लोकांसोबत नातं बनवणे ही मोठी गोष्ट नाही... पण एका बरोबर मनापासून टिकवणे ही खरचं खूप मोठी गोष्ट आहे...! साधेपणा हे सगळ्यापेक्षा चांगले सौंदर्य आहे, क्षमा ही चांगली शक्ती आहे, विनम्रता हा सगळ्यात चांगला स्वभाव आहे.. आणि आपलेपणा हे सर्वात श्रेष्ठ नातं आहे.**

**आनंद हा सारखाच असतो; परंतु त्याला शोधण्याचे मार्ग वेगळे असतात..! जेंव्हा नशिबाची बेरीज चुकायला लागते ना तेंव्हा आयुष्यातून माणसांची वजाबाकी सुरु होते..! अपेक्षा आणि समाधान यात अंतर एवढचं की, अपेक्षा माणसाला दुःखात ठेवते आणि समाधान माणसाला सुखात ठेवते..!**

**माणसाने श्रीमंतीच कौतुक जरूर करावं पण, साधेपणाला दरिद्रय कधीच समजू नये..! दुःखाची झळ आणि वेदनेची कळ त्याच लोकांना कळते जे प्रामाणिकपणे सरळ साधे आयुष्य जगत असतात..!**

**प्रत्येक ह्रदयाची एक अबोल अशी भाषा असते ती काहींच्या डोळ्यातून काहींच्या मनातून काहींच्या अंतर्मनातून तर काहींच्या स्मित हास्यातून व्यक्त होते..!**

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)



रयत शिक्षण संस्थेच्या जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि जनता कन्या विद्यालय, काष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे माजी मंत्री बबनराव दादा पाचपुते होते.

जयंतीनिमित्त सकाळी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या लेझीम व झांज पथकासह जनता कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींच्या टिपरी नृत्याने मिरवणुकीत रंगत आणली. ढोल, ताशे आणि घोषणांच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीनंतर विद्यार्थ्यांना अल्पोपाहाराचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सुप्रसिद्ध लेखक व विनोदी कथाकार डॉ. संजय कळमकर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा प्रेरणादायी आढावा घेतला. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी केलेला त्याग आणि संघर्ष अधोरेखित करताना, कर्मवीर भाऊराव पाटील हे आधुनिक महाराष्ट्राचे ज्ञानभगीरथ असून राज्याच्या जडणघडणीत त्यांचे योगदान मोलाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा विवेकाने वापर करावा, पालकांनी मुलांशी सातत्याने संवाद साधावा आणि आई-वडिलांनाच आदर्श मानून त्यांना अभिमान वाटेल असे कार्य करावे, असा संदेशही त्यांनी दिला. विनोदी उदाहरणांमधून त्यांनी जुन्या व आजच्या समाजजीवनातील बदल विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे उलगडले.

अध्यक्षीय भाषणात बबनराव दादा पाचपुते यांनी आपण रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी असल्याचा अभिमान व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून कष्ट करण्याची तयारी ठेवावी, उपलब्ध शैक्षणिक संधींचा पुरेपूर लाभ घ्यावा आणि आई-वडिलांसह विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य शिवप्रसाद मेहेत्रे यांनी केले, तर मुख्याध्यापिका मंगल जोगदंड यांनी विद्यालयाचा अहवाल सादर केला. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी काष्टी सेवा सोसायटीचे चेअरमन राकेश भाऊ पाचपुते, अरुणराव पाचपुते, भगवानराव आबा पाचपुते, सुनीलराव संभाजी पाचपुते, सुनंदा काकी पाचपुते, राजेंद्र सयाजी पाचपुते, संजय काळे, नवनाथ आबा राहींज, चांगदेव पाचपुते (मेजर), प्रेमराज राहींज, सुनील बाजीराव पाचपुते, डॉ. अनिल कोकाटे, अमोलराव पवार, ॲड. महेश दादा दरेकर, प्रवीण शेठ मुनोत, पत्रकार विवेकानंद फडणीस, राजेंद्र गुळवे, निवृत्ती शेलार यांच्यासह गावातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम निंभोरे आणि अर्चना कोरडे यांनी केले, तर आभार संजय मांडे यांनी मानले. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# यूपीआयवरील प्रस्तावित शुल्क म्हणजे दुष्काळात तेरावा महिना; अखेर सर्वसामान्यांचाच खिसा कापला जाणार

नवी मुंबई (समर्थ गांवकरी)

कन्फिडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) चे उपाध्यक्ष आणि ठाणे जिल्हा होलसेल व्यापारी वेल्फेअर महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेश भाई ठक्कर यांनी सांगितले कमी पाऊस, आखाती युद्ध आणि इतर कारणांमुळे देशात महागाई शिगेला पोहोचली आहे, असे मत यांनी व्यक्त केले. जाहीर करण्यात आलेली सरकारी आकडेवारी दर्शवते की किरकोळ महागाई दर मोठ्या प्रमाणावर वाढला असून सामान्य जनता महागाईने त्रस्त आहे. अशा परिस्थितीत सरकारने 'दुष्काळात तेरावा महिना' ठरवणारा प्रस्ताव आणत यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

ते पुढे म्हणाले, ₹२,००० पेक्षा अधिक रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्याच्या निर्णयाचा आम्ही तीव्र विरोध करतो. एकीकडे सरकार डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देऊ इच्छिते आणि दुसरीकडे अशा डिजिटल व्यवहारांवर शुल्क आकारत आहे-मग लोक डिजिटल पेमेंट का करतील?
यामुळे नागरिक पुन्हा एकदा रोख व्यवहारांकडे वळतील, ज्यामुळे 'डिजिटल इंडिया'
मोहिमेला मोठा धक्का बसेल.

सरकारने ₹२,००० पेक्षा जास्त रकमेच्या व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट (चऊठ) लागू करण्याचा मार्ग खुला केला आहे. हे शुल्क ग्राहकाकडून नाही तर व्यापाऱ्याकडून घेतले जाईल, असा दावा सरकार करत असले तरी वस्तुस्थिती अशी आहे की दुकानदार ते स्वतःच्या खिशातून न भरता शेवटी ग्राहकाकडूनच वसूल करेल. ₹२,००० पेक्षा जास्त किमतीच्या खरेदीवर दुकानदाराला १% जरी एमडीआर द्यावा लागला, तरी त्याचे ₹२० चे नुकसान होईल. तो ही रक्कम एकतर ग्राहकाकडून मागेल किंवा वस्तू महाग विकेल.

सुरेश बाई ठक्कर ठक्कर यांनी सांगितले, आम्ही देशभरात डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबवली होती. लहानात लहान दुकानदार तसेच फेरीवाल्यांनाही यूपीआय वापरण्यास प्रवृत्त केले. परिणामी आज देशभरातील छोटे-मोठे दुकानदार डिजिटल पेमेंट स्वीकारत आहेत; परंतु सरकारची ही भूमिका समजण्याच्या पलीकडची आहे.

आज देशातील प्रमुख महानगरांमध्ये सुमारे ८५% व्यवहार हे यूपीआयद्वारे केले जातात. जर एमडीआर लागू झाला, तर व्यापाऱ्यांना नाईलाजाने म्हणावे लागेल-'₹२,००० पेक्षा जास्त रकमेसाठी यूपीआय चालणार नाही, रोख रक्कम द्या.' सरकारच्या मते केवळ ४% व्यवहार ₹२,००० पेक्षा जास्त रकमेचे असतात; परंतु एकूण व्यवहारांच्या मूल्याचा विचार केल्यास (व्हॅल्यू) त्यांचा वाटा जवळपास ६५% आहे. याचा थेट अर्थ असा की बहुतेक सर्व व्यापारी व्यवहारांवरच हे शुल्क आकारले जाईल. इलेक्ट्रॉनिक्स, मोबाईल, कापड, दागिने, फर्निचर, किराणा माल आणि घाऊक व्यापार यांतील बहुतांश व्यवहार ₹२,००० च्या वरच असतात.

व्यापाऱ्यांचा नफा साधारणपणे १-२% पर्यंतच असतो, अशा वेळी ते एमडीआरचा भार कसा सहन करणार? अर्थ मंत्रालयाच्या नियमांनुसार छोट्या व्यापाऱ्यांसाठी दरमहा ₹१ लाख रुपयांपर्यंतच्या व्यवहारांवर शून्य एमडीआरची तरतूद आहे; परंतु महागाईच्या काळात ही मर्यादा पुरेशी नाही. महानगरांमध्ये आणि मोठ्या शहरांमध्ये अगदी सर्वसामान्य किराणा दुकानांचा डिजिटल व्यवसायही महिन्याला ₹१ लाख रुपयांची मर्यादा सहज ओलांडतो. सध्या किराणा दुकानांवर होणाऱ्या एकूण व्यवहारांपैकी सुमारे ६०% व्यवहार यूपीआयद्वारे होतात. छोटे व्यापारी आधीच ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स, क्विक कॉमर्स, वाढता व्यवसाय खर्च आणि घटणारा नफा या समस्यांशी झुंजत आहेत. अशा स्थितीत ₹२,००० पेक्षा जास्त रकमेच्या पर्सन-टू-मर्चंट (झ२च्) व्यवहारांवर शुल्क आकारल्यास त्यांची आर्थिक स्थिती आणखी बिकट होईल.

उदय सुरेश भाई ठक्कर यांनी शेवटी मागणी केली की, २०20 पासून सुरू असलेल्या पद्धतीनुसार यूपीआय आणि रुपे (ठींझरू) डेबिट कार्ड पूर्णपणे एमडीआरमुक्तच ठेवले पाहिजेत. जर बँकांना परिचालन खर्चाची अडचण येत असेल, तर सरकारने त्यांना थेट अनुदान (इन्सेंटिव्ह) द्यावे, परंतु व्यापारी आणि सामान्य ग्राहकांवर याचा बोजा टाकू नये.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की गाव मौजे रेटवडी तालुका खेड जिल्हा पुणे खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमिनीचे विद्यमान मालक श्री प्रकाश लंकू सुतार/ आनंदकर कृष्णाबाई लंकु सुतार/आनंदकर मु.पो. भोसे चव्हाण वस्ती तालुका खेड जिल्हा पुणे व प्रल्हाद वामन सुतार/ आनंदकर बाळू वामन सुतार/आनंदकर कैलास वामन सुतार/आनंदकर मुक्काम पोस्ट कान्हेवाडी तालुका खेड जिल्हा पुणे यांच्या मालकीची आहे. सदरची मिळकत विद्यमान मालक यांच्या प्रत्यक्ष ताबा वहिवाटीत असल्याचा व त्याची विक्री करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिल श्री अनिकेत शिवाजी पवळे संजीत शिवाजी पवळे व मंगल शिवाजी पवळे मुक्काम पोस्ट रेटवडी तालुका खेड जिल्हा पुणे यांना दिलेला आहे व आमच्या आशिलांनी सदर मिळकत कायम खुश खरेदीने घेण्याचे निश्चित केलेले आहे सदर मिळकती मध्ये अन्य कोणाचे तोंडी अथवा लेखी करार, मदार,खरेदी,आदलाबदल, गहाण, दान, ट्रस्ट विकसनाचे अधिकार,वारस हक्क, मृत्युपत्र, ताबा, लीज पेंडन्सी लीज लायसन्स, लीज मेंटेनन्स, भाडेपट्टा, कुळ, पोटगी, अन्य वहिवाट अथवा अन्य हक्क, हितसंबध, अथवा कुल मुख्तारपत्र, अथवा आग्रहक्काने, कोणतेही हक्क असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध होताच सात (७) दिवसाच्या आत मूळ कागदपत्रांनीशी आमच्याकडे लेखी कळवुन खात्री करून द्यावी अन्यथा त्यांनी त्यांचे तथाकथित हक्क हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील व तथाकथित हितसंबंध आमचे आशिल यांच्या वर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी

परिशिष्ट मिळकत

तुकडे पुणे पोट तुकडी, तालुका खेड जिल्हा परिषद पुणे,तालुका खेड जिल्हा परिषद पुणे,पंचायत समिती खेड,यांच्या कार्यक्षेत्रातील मे सब रजिस्टर साहेब खेड यांच्या हद्दीतील व तसेच ग्रामपंचायत रेटवडी यांच्या हद्दीतील गाव मौजे रेटवडी तालुका खेड जिल्हा पुणे येथील शेत जमीन मिळकत गट नंबर ३६३ यापैकी विद्यमान मालक प्रकाश लंकू सुतार/आनंदकर व कृष्णाबाई लंकू सुतार/आनंदकर यांची संपूर्ण अविभक्त हिस्याची एकूण क्षेत्र ६४.३२ व विद्यमान मालक प्रल्हाद वामन सुतार/आनंदकर बाळू वामन सुतार/आनंदकर व कैलास वामन सुतार/आनंदकर यांच्या संपूर्ण अविभक्त हिस्याची एकूण क्षेत्र ४८.२४ आर. येणे प्रमाणे चर्तुः सीमापूर्वक मिळकतीत कोणतेही हक्क राखून न ठेवता येणे प्रमाणे जमीन मिळकत गट.नंबर ३६३ हा आमच्या जाहीर नोटीसचा विषय आहे.

अनिकेत शिवाजी पवळे
संजीत शिवाजी पवळे
मंगल शिवाजी पवळे

ॲड.वृषाली धीरेंद्र जोशी
(B.S.L.L.LL.B)
पत्ता :- ऑफिस नंबर ३०४ तिसरा मजला शिव अंकुशा चेंबर राजगुरुनगर कोर्टाजवळ तालुका खेड जिल्हा पुणे ४१० ५०५

प्रसिध्दी दिनांक : २७/०१/२०२६ मोबा नंबर : ९०११०१०७२३

# कोरठण खंडोबा मंदिराच्या कळसावर वीज कोसळली

पारनेर (समर्थ गांवकरी)



राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानच्या मंदिराच्या मुख्य कळसावर सोमवारी (दि. २१) रात्री झालेल्या जोरदार विजेच्या कडकडाटासह पावसादरम्यान वीज कोसळली. झालेल्या या घटनेत मंदिराच्या मुख्य पितळी कळस काळा पडला आहे.

वीज थेट मंदिराच्या मुख्य कळसावर कोसळल्याने मंदिरातील विद्युत यंत्रणेलाही मोठा फटका बसला. मंदिरातील वीज वाहक तारा जळाल्या असून सीसीटीव्ही कॅमेरे, कॅमेऱ्यांचे संगणक, फ्रिज तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक व विद्युत उपकरणांचे नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे मंदिर प्रशासनाची मोठी आर्थिक हानी झाली आहे.




# कोतुळ आदिवासी संस्थेच्या सात संचालकांवर अपात्रतेची कुऱ्हाड

## कर्ज थकबाकीप्रकरणी सहाय्यक निबंधकांचा आदेश; विद्यमान चेअरमनसह माजी चेअरमनचा समावेश – सहकार क्षेत्रात खळबळ

कोतुळ (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील आदिवासी विभागातील महत्त्वाची आणि सर्वात मोठ्या संस्थांपैकी एक असलेल्या कोतुळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सात विद्यमान संचालकांवर कर्ज थकबाकीच्या कारणावरून अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी शुक्रवारी याबाबत आदेश जारी केला. या कारवाईत संस्थेचे विद्यमान चेअरमन विशाल नामदेव गोडे तसेच माजी चेअरमन व विद्यमान संचालक रघुनाथ गेनू जाधव यांचा समावेश असल्याने कोतुळसह अकोले तालुक्यातील सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ क-अ (१) मधील पोटकलम (१)(ब) नुसार ही कारवाई करण्यात आली आहे. आदेशानुसार, संबंधित संचालक हे संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या थकबाकीत असल्याने समिती सदस्य अथवा संचालक म्हणून पदावर राहण्यास अपात्र ठरत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

कारवाई झालेल्या संचालकांमध्ये विशाल नामदेव गोडे यांच्याकडे ₹६२,५००, रघुनाथ गेनू जाधव ₹७५,०००, संदीप रघुनाथ लेंभे ₹१,००,०००, बाळासाहेब लक्ष्मण लेंभे ₹१,२१,७०१, भागा गंगाराम शेळके ₹२५,०००, उषा नामदेव गोडे ₹२,२५,००० आणि सुगंधाबाई नामदेव बांबळे ₹१,१२,५०० इतकी थकबाकी असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाला सुरुवात ८ जुलै २०२६ रोजी झाली. सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी बी. जे. देशमुख व अन्य दोघांनी सहाय्यक निबंधकांकडे तक्रार अर्ज दाखल करून संस्थेचे बहुसंख्य समिती सदस्य ३१ मार्च २०२६ अखेर थकबाकीत असल्याचा दावा केला होता. संबंधित संचालकांवर कायद्यानुसार कारवाई करून त्यांचे समिती सदस्यपद रद्द करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली होती.

तक्रारीनंतर या प्रकरणाची ३० जुलै, १८ ऑगस्ट आणि ३ सप्टेंबर २०२६ रोजी सुनावणी झाली. संबंधित समिती सदस्यांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. सुनावणीदरम्यान मांडण्यात आलेली बाजू, उपलब्ध वस्तुस्थिती आणि कायद्यातील संबंधित तरतुदींचा विचार केल्यानंतर सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी सात संचालकांविरोधात अपात्रतेचा आदेश जारी केला.

**पाच वर्षांसाठी अपात्रता**

आदेशानुसार, संबंधित संचालकांना संस्थेच्या समितीचे सदस्य व संचालक म्हणून राहण्यास अपात्र ठरविण्यात आले असून, आदेशाच्या दिनांकापासून त्यांची पदे रिक्त झाल्याचे समजण्यात येणार आहे. तसेच संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार पुढील पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत संस्थेच्या कोणत्याही समितीवर सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, स्वीकृत होण्यास किंवा नामनिर्देशित होण्यास अपात्र घोषित करण्यात आले आहे.

**संस्थेच्या सत्तासमीकरणाला धक्का?**

कोतुळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था ही आदिवासी विभागातील महत्त्वाची संस्था असल्याने एकाचवेळी सात संचालकांवर झालेल्या कारवाईचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः विद्यमान चेअरमन आणि माजी चेअरमन यांचा या यादीत समावेश असल्याने संस्थेतील सत्तासमीकरणावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या निर्णयामुळे संस्थेतील सत्ताधारी आणि विरोधी गटांमधील संघर्षाला नवे वळण मिळण्याची शक्यता असून, रिक्त झालेल्या संचालकपदांबाबत पुढील प्रशासकीय प्रक्रिया काय होते, याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या आदेशाविरोधात संबंधितांकडून पुढील कायदेशीर पाऊल उचलले जाते का, याकडेही सहकार क्षेत्राचे लक्ष आहे.













हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९